# सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

अध्यक्ष : आता मी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा घेत आहे. विधानसभेचे सोमवार, दिनांक 05 डिसेंबर, 2016 पासून नागपूर येथे सुरु झालेले हिवाळी अधिवेशन आज शनिवार, दिनांक 17 डिसेंबर, 2016 रोजी संस्थगित होत आहे.

या सभागृहाच्या बैठकांची एकूण संख्या 10 असून प्रत्यक्षात 66 तास 40 मिनिटे कामकाज झालेले आहे. मंत्री उपस्थित नसल्यामुळे 05 मिनिटे व अन्य कारणामुळे 03 तास 05 मिनिटे असा कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी 03 तास 10 मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज 06 तास 40 मिनिटे झालेले आहे.

एकूण प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या 8579 असून स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या 441 असून सभागृहात 37 प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. एकूण प्राप्त झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या 08 असून स्वीकृत झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या 0 आहे.

एकूण प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या 2211 असून स्वीकृत लक्षवेधी सूचना 82 इतक्या आहेत. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना 19 आहेत.

या अधिवेशनात विधानसभेने एकूण 16 विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी एकूण 11 विधेयके (विधानसभेची 10 व विधान परिषदेचे 01) संमत केली.

अर्धा तास चर्चेच्या एकूण 173 सूचना प्राप्त झाल्या त्यापैकी 54 स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात 01 अर्धा तास चर्चेच्या सूचनांवर चर्चा झाली.